# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

## राष्ट्रीय सेवा योजना

कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, इंदापूर, जि. पुणे

आयोजित

# विशेष श्रमसंस्कार शिबिर

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आणि माझी वसुंधरा अभियान अंतर्गत

## अहवाल

स्थळ : बिजवडी, ता. इंदापूर, जि. पुणे

शिबिर कालावधी

दि. २० ते २६ फेब्रुवारी २०२३

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे व राष्ट्रीय सेवा योजना
कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, इंदापूर, आयोजित

**हिवाळी श्रमसंस्कार शिबिर**

**बिजवडी, ता. इंदापूर, जि. पुणे.**

उद्घाटन समारंभ

दि. २०/०२/२०२३

उद्घाटन समारंभाची सुरूवात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गीताने झाली.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू व कुलगुरू, विश्वकर्मा विद्यापीठ पुणे डॉ. वासुदेवजी गाडे, मा. श्री. हर्षवर्धन पाटील साहेब आणि श्री. छगन भोंगळे, श्री. भागवत गटकुळ, श्री. नारायण वीर, श्री. ज्ञानदेव बनकर, श्री. उत्तम जाधव, श्री. हनुमंत जाधव, श्री. मच्छिंद्र अभंग, श्री. छगन बोराटे, श्री. तुकाराम जाधव, सौ. कोमल कचरे, श्री. दादाराम काळेल, श्री. देवराव लोकरे, श्री. बापू सातव व इतर प्रमुख मान्यवर यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन आणि सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले.







Shot by SHIVAM






realme
Shot by SHIVAM
2023/02/20 16:30

**प्रास्ताविक : डॉ. जीवन सरवदे**

आपल्या प्रास्ताविकेमध्ये ते म्हणाले की, दि. २० ते २६ फेब्रुवारी २०२३ या कालावधीत हिवाळी श्रमसंस्कार शिबिर चालणार आहे. या कार्यक्रमाला माजी कुलगुरू डॉ. वासुदेव गाडे साहेबांना फोन केला व मा. हर्षवर्धनजी पाटील साहेबांचा निरोप दिला की आपल्याला आमच्या महाविद्यालयाच्या हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटक म्हणून विनंती केली आहे व आदरणीय गाडे साहेबांनी विनंतीस मान देवून या कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून उपस्थित राहिले याचा मला मनस्वी आनंद आहे. या गावातील नागरिक विद्यार्थ्यांना मदत करतील व विद्यार्थी लोकांमध्ये मिसळून काम करतील हा मला विश्वास आहे.

या शिबिर कालावधीमध्ये जी.आय.एस. मॅपिंग, माती व पाणी परीक्षण, कोरोना जनजागृती, कौशल्य विकास प्रात्यक्षिक इ. वेगवेगळया उपक्रमांसाठी स्वयंसेवक कार्य करणार आहेत.







राष्ट्रीय सेवा योजना शिबिर हे कार्यक्रम अधिकार—यांचे नसून स्वयंसेवकांचे आहे. त्यामुळे स्वयंसेवकांनी स्वत:हून कार्यक्रम पत्रिकेच्या वेळा पाळणे गरजेचे आहे. गावातील सामाजिक प्रश्न समजावून घेवून ते सोडविता येतील का यादृष्टीने स्वयंसेवकाने प्रयत्न करणे गरजेचे आहे. आपल्या शिक्षणाचा गावातील प्रश्न सोडविण्यासाठी उपयोग करता येईल का यादृष्टीने देखील सर्व स्वयंसेवकांनी प्रयत्न करावे असे आवाहन डॉ. जीवन सरवदे यांनी केले.

**डॉ. राजेंद्र साळुंखे** यांनी सात दिवसीय शिबिरामध्ये एकूण काय कार्यक्रम पत्रिका असणार आहे आणि सात दिवसामध्ये रोसेयो चे स्वयंसेवक गावामध्ये काय काम करणार आहेत याची मांडणी केली.

१. बिजवडी गावचे इतिहास लेखन
२. जैवविविधता अभ्यास
३. जी.आय.एस मॅपिंग
४. आर्थिक सर्वेक्षण
५. स्वच्छता जनजागृती
६. एड्स जनजागृती
७. कारोना जनजागृती
८. वृक्षारोपण
९. सलग समपातळी चर





या वेगवेगळया उपक्रमात १५० स्वयंसेवक सहभागी होणार आहेत. सकाळी ६ ते७ प्रार्थना, ७ ते ७.३० व्यायाम, ७.३० ते ८ नाष्टा व ८ ते १२ श्रमदान नंतर ३ ते ५ वैचारिक व्याख्यानमाला आणि रात्री सांस्कृतिक कार्यक्रम अशा प्रकारे पूर्ण शिबिराचा कालावधी स्वयंसेवकाची दिनचर्या असणार आहे याची मांडणी केली.

**यांनतर प्रमुख पाहुण्यांचा स्वागत समारंभाचा कार्यक्रम झाला.**








## माजी स्वयंसेवकांचे मनोगत

### १. कुमार शिंदे

या माजी स्वयंसेवकाने आपले मनोगत व्यक्त करताना मांडणी केली की, २०१६ साली मी महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतला त्याच वर्षी आजोती या गावी रासेयो चे हिवाळी श्रमसंस्कार शिबिर होते. ख–या अर्थाने त्या शिबिरापासून माझी जडणघडण सुरू झाली. मला माझ्यातली कला गवसली. एन.एस.एस मधूनच मी उत्कृष्ट किर्तनकार, उत्कृष्ट गायक व उत्कृष्ट भारूडकर बनलो.



एन.एस.एस मुळेच मला काय बोलले पाहिजे, कसे राहिले पाहिजे, आपले चारित्र्य कसे जपले पाहिजे याचे भान आले. २०१८ साली लखनौ येथे झालेल्या रासेयो च्या कार्यक्रमात मला सहभाग घेता आला. एवढेच नाहीतर आय कॉलेज व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे नेतृत्व मला करता आले. वास्तविक पाहता एन.एस.एस ने मला माझ्यातला माणूस शोधून दिला.

२. महेश मोहिते

एनए.एस.एस च्या अनेक शिबिरामध्ये मी सहभाग घेतला व निस्वार्थपणे काम केले त्याचे फळ मला मिळाले ते म्हणजे उत्कृष्ट शिबिरार्थी म्हणून माझा सत्कार झाला. एन.एस.एसमुळेच मला जीवन जगताना ध्येय ठेवून जगले पाहिजे, काहितरी उर्मी घेवून जगले पाहिजे, समाजभान व राष्ट्रभान ठेवले पाहिजे याचे भान आले.



३. स्वप्नाली गायकवाड

आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाली की हे रासेयो चे माझे पहिलेच वर्ष आहे. या शिबिरात मला नक्की काहितरी मिळले. माझ्या ध्येयपूर्तीची प्रेरणा या शिबिरातून मिळेल व येणा—या काळात मी नक्की अधिकारी बनेल हा मला विश्वास वाटतो.

**डॉ. वासुदेव गाडे**

आपले मनोगत व्यक्त करताना डॉ. वासुदेव गाडे म्हणाले की, मी विद्यापीठामध्ये कुलगुरू असल्यापासूनच किंवा त्या अगोदरपासून आदरणीय हर्षवर्धनजी पाटील साहेबांचा पाठिंबा व मदत मिळालेली आहे. साहेबांनी मला याही अगोदर दोन – तीन वेळा बोलावले होते व मी उपस्थितही राहिलो होतो. विद्यापीठामध्ये वेगवेगळया ॲक्टीव्हिटी चालविल्या जातात. त्यातील सर्वांत महत्वाची व माझी आवडती ॲक्टीव्हिटी म्हणजे एन.एस.एस होय. एन.एस.एस च्या माध्यमातून जबाबदार स्वयंसेवक व नागरिक बनावा तसेच समाजाचे प्रश्न सोडविण्यास तत्पर स्वयंसेवक घडावे ही एन. एस.एस कडून अपेक्षा आहे. एवढेच नव्हे तर ही श्रमसंस्कार शिबिरांची भूमिका आहे.





पुणे विद्यापीठाने स्वत:च्या बजेट मधून एन.एस.एस साठी वेगळी आर्थिक तरतूद केलेली आहे. त्यामुळे इतर विद्यापीठापेक्षा वेगळे व दर्जेदार आहे. इथे ज्या तीन विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले त्यातून आपल्याला लक्षात आले की या तीनही विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण झालेला आहे. त्याचबरोबर संवाद कौशल्य वाढलेले आहे आणि त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास झालेला आहे ही सर्व एन.एस.एसची देण आहे.

एन.एस.एस मधून जबाबदार माणूस, जबाबदार नागरिक, चारित्र संपन्न नागरिक बनविणे ही विद्यापीठ व एन.एस.एस ची जबाबदारी आहे. विद्यार्थी व समाज यांचे नाते घट्ट करणे गरजेचे आहे. समाजातील समस्या शिक्षणाच्या माध्यमातून कशा सोडविता येतील यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्या सर्व स्वयंसेवकांना मला आवाहन करायचे आहे की तुम्ही खूप चांगले काम करता ही अभिमानाची गोष्ट आहे पण रोसेयो योजनेचे विद्यार्थी असताना अभ्यासाकडे दुर्लक्ष होता कामा नये. अन्यथा तुमचे कार्य व ध्येय अपूर्ण राहील. जे जे लोक आज सामाजिक, आर्थिक, राजकीय इ. वेगवेगळया क्षेत्रात पुढे आलेले आहेत ते सर्व लोक त्यांच्या विद्यार्थीदशेत टॉपर होते. तुम्हीही विद्यार्थीदशेत टॉपर राहिले पाहिजे. तुम्ही कोणत्याही क्षेत्रात जा तुम्हाला उत्कृष्ट माणूस बनायचे आहे हे लक्षात ठेवा.



आपला अभ्यास व समाजाचे प्रश्न यात सांगड घालता आली पाहिजे. कारण उद्याचा भारत आपल्याला घडवायचा आहे व उद्याचा भारत घडविण्याची जबाबदारी तरूणावर व विद्यापीठावर येवून पडते. देशातील अनेक समस्यांवर काम करून योग्य परिवर्तन घडवायचे असेल तर विद्यार्थ्यांने अभ्यास करत सामाजिक जबाबदारीने काम केले पाहिजे. नवीन शैक्षणिक धोरणाचा सर्वात मोठा उद्‌देश म्हणजे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे हा होय. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाण रूजविणे होय. ज्याला अशी जाण असते तोच चांगला नागरिक बनतो. साहेबांनी माझी विनंती आहे की, शासनाच्या माध्यमातनू रासेयोसाठी चांगली प्रोव्हिजन करावी. कारण पुणे विद्यापीठ आर्थिकदृष्टया सक्षम आहे तसेच महाराष्ट्रातील इतर विद्यापीठ आर्थिकदृष्टया सक्षम नाहीत त्यामुळे त्यांना आर्थिक मदत करता येईल का यासाठी साहेबांनी प्रयत्न करावे व शासनाला एन.एस.एस चे महत्व पटवून द्यावे.

**हर्षवर्धनजी पाटील साहेब** म्हणाले की, इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने सर्वांत पहिल्यांदा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या माजी कुलगुरूंचे स्वागत करतो. चार दिवसापूर्वी मी त्यांना निरोप दिला. त्यांचे वय ६९ वर्ष असून पण ते आपल्या विनंतीला मान देवून आले. कारण त्यांचे व आपले ऋणानुबंध असल्यामुळेच ते शिबिराला उपस्थित राहिले.





जवळपास इंदापूर तालुक्यातील २५ टक्के संख्या या शिक्षण घेणा—या विद्यार्थ्यांची आहे. या मतदार संघातील २५ हजारापेक्षा अधिक विद्यार्थी गावातून येवून शिक्षण घेत आहेत.

जो माणूस सामान्यासारखे वागतो तो नक्कीच मोठा बनतो. आपण कोणतेही काम करण्यास कमीपणा मानू नका. हे सर्व स्वयंसेवक आपल्या राष्ट्राचे भवितव्य आहेत. शिक्षण हे फक्त नोकरीसाठी म्हणून नाही तर शिक्षणाबरोबर संस्कार, क्रीडाक्षेत्र, ज्ञान, विनम्रता महत्वाची आहे. असे गुण अंगी आणले तर देशाचे उत्तम नागरिक बनणार याबद्दल कसलीही शंका नाही.

या सात दिवसात स्वयंसेवकांचे व्यक्तीमत्व बदलेल या श्रमसंस्काराची शिदोरी स्वयंसेवकाला आयुष्यभरासाठी पुरेल असा मला पूर्ण विश्वास आहे असे यावेळी त्यांनी सांगितले. तसेच बिजवडी गावची जबाबदारी आहे या १५० स्वयंसेवकांची व्यवस्था व सर्व ग्रामस्थांनी केली पाहिजे. बौध्दिक कार्यक्रम, सांस्कृतिक

कार्यक्रम व्यायाम, श्रमदान असे सर्व कार्यक्रमांचे नियोजन आहे. सर्व कार्यक्रम पत्रिकेप्रमाणे झाले पाहिजेत व होतील याचा मला पूर्ण विश्वास आहे.

गावाकडून समृध्दीकडे हा गांधींचा मूलमंत्र आहे. त्याला केंद्रित ठेवून आपण काम केले पाहिजे. या शिबिराच्या कालावधीमध्ये गावाचा इतिहास लिहिणे, सामाजिक आर्थिक सर्वेक्षण करणे, जी.आय.एस मॅपिंग करणे, माती व पाणी परीक्षण करणे, जैवविविधतेचा अभ्यास करणे हे सर्व तुम्ही या शिबिर कालावधीमध्ये करणार आहात.







येणा—या परिस्थितीला तोंड देणारे अष्टपैलू व्यक्तिमत्व या शिबिराच्या माध्यमातून होणार आहे. माझी गावक—यांना विनंती आहे ही सर्व मुले तुमची पाहुणे आहेत त्यांचा चांगला पाहुणचार करा. तसेच त्यांच्याशी एकसंघ व्हा असू सांगून सर्व शिबिरार्थींना शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सौ. सुवर्णा जाधव व डॉ. फिरोज शेख यांनी केले. आभार उपप्राचार्य प्रा. नागनाथ ढवळे यांनी मानले.



# स्वयंसेवकांची ओळख

उद्घाटनाचा कार्यक्रम संपल्यानंतर सर्व स्वयंसेवकांना चहा देण्यात आला. त्यानंतर सर्व स्वयंसेवकांना एकत्र बसविण्यात आले व त्यांना कार्यक्रम अधिकारी यांनी मार्गदर्शन केले. सर्व स्वयंसेवकांना शिबिरासदंर्भातील सूचना देण्यात आल्या. शिबिरातील होणा—या कार्यक्रमांविषयी माहिती देण्यात आली.



सर्व स्वयंसेवकांना विविध सूचना दिल्यानंतर ओळख करून देणे व एकमेकांची ओळख करून घेणे अशा प्रकारचा कार्यक्रम घेण्यात आला. यामध्ये प्रत्येक स्वयंसेवकाने पुढे येवून आपले नाव, महाविद्यालयाचे नाव, आवडता छंद, मिळालेले गुण अशा विविध प्रकारची माहिती सांगून स्वतःची ओळख करून देण्याचा कार्यक्रम घेण्यात आला.

अशा प्रकारे बिजवडी या गावातील हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचा पहिला दिवस अतिशयय सुंदर आणि चांगल्या प्रकारे पार पाडला.

# उद्घाटन समारंभातील अविस्मरणीय क्षण














राष्ट्रीय सेवा योजना
विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर

## श्रमसंस्कार शिबिराचा दुसरा दिवस

## प्रार्थना व कवायत

२१/०२/२०२३

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे, राष्ट्रीय सेवा योजना कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, इंदापूर, जि. पुणे आयोजित सात दिवसीय विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचा उद्घाटन समारंभ झाल्यानंतर दुस—या दिवसाची सुरूवात झाली. दि. २१/०२/२०२३ या दिवशी पहाटे ०५.०० वाजल्यापासून स्वयंसेवकांची गजबज सुरू झाली. शिबिराच्या पहिल्या दिवशी दिलेल्या सूचनेनुसार सर्व नियमांप्रमाणे सर्व स्वयंसेवक योगा करण्यासाठी सकाळी ६.०० वा. बिजवडी येथील लिलावती मंगल कार्यालय या ठिकाणी उपस्थित राहिले. सकाळी ६.०० ते ७.३० या वेळेमध्ये प्रभात प्रार्थनेचे नियोजन करण्यात आले होते. प्रत्येक गटाकडून खालील गोष्टी करून घेण्यात आल्या.

१) योगा व प्राणायमे

२) प्रार्थना — खरा तो एकची धर्म, हम होंगे कामयाब इतनी शक्ती हमे देना दाता

३) पसायदान

४) दिनविशेष

५) रा.से.यो. गीत

६) विद्यापीठगीत

७) सुविचार

८) देशभक्तीपर गीत

९) पसायदान

१०) राष्ट्रगीत





ही योगासने करत असताना स्वयंसेवकांना २० व्यायामाचे प्रकार शिकविण्यात आले. त्यांच्याकडून ते करून घेण्यात आले. अशा प्रकारच्या व्यायामांचे आणि योगासनांचे भविष्यात कशा प्रकारे फायदा होवू शकतो हे सांगितले. कोणत्या प्रकारच्या आजारापासून आपण आपला बचाव करू शकतो याबाबात डॉ. फिरोज शेख यांनी मार्गदर्शन केले व योगाप्रकार करून घेतले.





सर्व प्रकारचे योगासने आणि व्यायाम झाल्यानंतर योगाचा कार्यक्रमाचा राष्ट्रगीताने शेवट करण्यात आला. स्वयंसेवकांना चहा व नाष्टा करण्यासाठी परवानगी दिली.

**स्वच्छता अभियान :**

सर्व स्वयंसेवकांनी बिजवडी गावामध्ये प्रभात फेरी काढली व गावामधील लोकांना स्वच्छते संदर्भात जनजागृती केली.

या सर्व ग्रुपमधील स्वयंसेवकांनी गावातील परिसर स्वच्छ करण्याचे एक महत्वपूर्ण काम या शिबिरातील स्वयंसेवकांनी केले आहे.




यामध्ये स्वयंसेवकांनी लिलावती मंगल कार्यालयासमोरील वन विभागाच्या १०० वृक्षांना आळी करण्याचे काम केले.




बिजवडी या गावातील ग्रामस्थ स्वखुशीने स्वच्छतेच्या कामात स्वयंसेवकांना सहकार्य करत होते. काम करत असताना लागणारे साहित्य पुरवत होते. त्यामुळे काम करणे अधिक सोईचे झाले.







गावातील अनेक लोकांच्या घराशेजारचा परिसर स्वच्छ करत असताना ते स्वयंसेवकांना सहकार्य करू लागत त्याचबरोबर त्यांना आवश्यक असणा—या साहित्य देत असत.









**सदिच्छा भेट :**

दुपारील सत्रात कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जीवन सरवदे, विज्ञान विभाग प्रमुख डॉ. शिवाजी वीर आणि कला विभागप्रमुख डॉ. भिमाजी भोर, गणित या विषयाचे विभागप्रमुख प्रा. बाळासाहेब काळे, कार्यालयीन अधिक्षक श्री. अभिमन्यू भंडलकर, श्री. दत्तात्रय परकाळे यांनी श्रमसंस्कार शिबिरास सदिच्छा भेट दिली.

**तानाजी पाडुळे :**

दुपारील बौध्दिक सत्रामध्ये श्री. तानाजी पाडुळे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारावर मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराज समजून घेताना मी कसा जगतो, कशासाठी जगतो हे समजून घेतले पाहिजे. केवळ जयंती करून शिवाजी महाराज समजणार नाहीत आज त्यांना डोक्यावर घेवून नाचणे सुरू आहे. जोपर्यंत त्यांचे विचार आपण समजून घेणार नाही तोपर्यंत इतिहास घडणार नाही. आपल्याला शिवाजी महाराज समजायला २०० वर्षे लागली तर संभाजी महाराज समजायला ३०० वर्षे लागली. इंग्लंडची राण एलिझाबेथ यांनी जाणीवपूर्वक छ. शिवाजी महाराज व छ. संभाजी महाराज यांचा खोटा व चुकीचा इतिहास मांडणी करायला लावली. आजही आपल्या समोर असा चुकीचा इतिहासच येत असतो.





आज जातीभेद निर्माण केले गेले व धर्म कधीही कळू दिला नाही. धर्माची व्याख्या काय? हे छ. संभाजी महाराजांचा इतिहास वाचून समजते. धर्मासाठी झुंजावे झुंजता झुंजता अवघे जिंकून घ्यावे. थोडक्यात काय तर जे ज्ञान घेतल्याशिवाय जगण्याला अर्थ प्राप्त होत नाही ते ज्ञान म्हणजे धर्म समजून घेणे होय. जीवनातल्या सर्व प्रश्नांचे उत्तर भगवतगितेत सापडते. माणसाने कसे जगावे हे भगवतगिता सांगते आणि माणसाने कसे मरावे हे भागवत धर्म शिकवितो. आपल्याला छ. शिवाजी महाराजांच्या चरित्रातून जगावे कसे हे समजते तर छ. संभाजी महाराजांच्या चरित्रातून मरावे कसे हे समजते.

अन्याय व अत्याचार करणे हा अधर्म आहे व कोणावरही अन्याय, अत्याचार न करणे म्हणजे धर्म होय. कारण अन्याय व अत्याचाराला जात व धर्म नसतोच. जगातला सर्वात मोठा धर्म म्हणजे सत्य होय. परिस्थिती तुम्हाला सर्व समजून घ्यायला भाग पाडते. कोणताही धर्म सत्यावर आधारित असतो. दु:खाचे कारण हे अज्ञान असते. आपल्याला ज्ञान नसते सत्य समजत नाही म्हणून आपण दु:खी होतो. आपण कायम लोभाच्या मागे धावतो. काहीतरी मिळाले की मी सुखी होईल ही अपेक्षा ठेवत जगतो म्हणून आपल्याला दु:ख होते. सत्य म्हणजे जे पूर्वीपासून आहे, आताही आहे व भविष्यातपण राहणार आहे तसेच ते त्रिकालाबाधीत असते ते सत्य असते.




छ. शिवाजी महाराज जिजाऊ मातेमुळे घडले. शिवाजी महाराज पोटात असताना जिजाऊ मातेला आपले बाळ अधर्माच्या विरोधात हातात तलवार घेवून लढत आहे असे डोहाळे लागत असे. म्हणून तर अन्यायाच्या विरोधात लढण्याचे संस्कार छत्रपती पोटात असतानाच त्यांच्यावर झालेले पाहायला मिळतात. आपण सर्व स्वयंसेवकांनी चारित्र घडविले पाहिजे. आयुष्यात कधीही भ्रष्टाचार करू नका व भ्रष्टाचार करणा—यांना पण साथ देवू नका असे आवाहन त्यांनी केले. जिजाऊ मातेने बाळ शिवाजी पोटात असतानाच स्वराज्य निर्माण व्हावे हे स्वप्न पाहिले होते. माणसाने पशू पेक्षा वेगळे जगले

पाहिजे. जीवनामध्ये सुख व समाधान मिळवायचे असेल तर चारित्रसंपन्न राहिले पाहिजे हे शिवचरित्रातून आपण शिकले पाहिजे.

छ. शिवाजी महाराजांनी कृष्णाजी कुलकर्णीला मारले. तसेच जावळीचे मोरे यांनाही जेरबंद केले. हे करताना त्यांची कोणाचीही जात, धर्म पाहिला नाही. जे अधर्माने वागतात त्यांना शिक्षा देण्याचे काम महाराजांनी केले. अलीकडच्या काळामध्ये तांब्याचा विष्णूबाळा, बापू बिरू वाटेगावकर ही काही अन्यायाच्या विरोधात लढणारी उदाहरणे सापडतात. वाटेगावर यांनी आपला मुलगा अधर्माने वागतो म्हणून त्यालाही गोळी घातली. कारण या लोकांचा धर्माने वागण्यावर विश्वास होता. अधर्माला यांच्याकडे थारा नव्हता.

इतिहास घडविणारे व्यसनी कधीच नसतात. तुम्हीपण व्यसन करू नका. जे काम आपल्या वाटयाला आले ते प्रामाणिक करा मग पहा तुमच्या आयुष्यात अपयश कधीच येणार नाही. परिस्थितीला गुलाम बनवितात तेच मोठे होतात. छ. राजे परिस्थितीचे गुलाम कधीच झाले नाहीत. उलट त्यांनी परिस्थितीला गुलाम बनविले व आपल्या कतृत्वाचा झेंडा फडकविला. तुम्हीही तुमच्या आयुष्यामध्ये निश्चित ध्येय ठेवून काटेकोर नियोजन करून शेवटच्या क्षणापर्यंत हार न मानता परिस्थितीशी झुंजत राहिलात तर तुम्ही निश्चितपणे ध्येय गाठू शकता हे बाजीप्रभू देशपांडे यांच्या उदाहरणावरून लक्षात घ्या.

सर्व स्वयंसेवकांना विंनती करतो की, तुम्ही तुमच्या आई वडिलांचे स्वप्न पूर्ण करा. त्यासाठी प्रयत्न करत राहा. तुमचे आईबाप तुम्ही शिक्षण घ्यावे, खूप मोठे व्हावे यासाठी आपल्या पोटाला चिमटा देवून पैसे साठवून तुम्हाला पाठवित असतात याचे भान ठेवा. आई वडिल स्वत: उपाशी राहून लेकराच्या पोटाची सोय करत असतात. स्वत: फाटके कपडे घालून तुम्हाला चांगले कपडे पुरवितात. मित्रांनो आईबाप आपल्या आयुष्यातले चंद्र सूर्य आहेत. तेच आपले खरे हिरो आहेत. त्यांचे नाव मोठे करण्यासाठी तुम्ही कायम प्रयत्नशील राहा असा आशावाद व्यक्त केला.

सुत्रसंचालन रोहिणी कुबडे या विद्यार्थीनीने केले तर आभार करे सागर या विद्यार्थ्याने मानले.

## राष्ट्रीय सेवा योजनेचे आजी माजी विद्यार्थी शिबिरातील स्वयंसेवकांना

## पथनाटय सादर करण्यासाठी मार्गदर्शन

**कलाकार** : १) महेश मोहिते

२) कुमार शिंदे

३) रोहित शिंदे

या आजी माजी स्वयंसेवकांनी शिबिरातील स्वयंसेवकांना पर्यावरण जनजागृती व वृक्षारोपण यासंदर्भात विशेष मार्गदर्शन केले.





यावेळी त्यांनी या स्किट मध्ये असे काही संदेश दिले की युवा पिढीमध्ये नक्कीच प्रबोधन होईल. आजच्या युगात पर्यावरण विषयी जाणीव जागृती होणे अत्यंत गरजेचे आहे. दैनंदिन जीवनाबरोबरच पर्यावरणाचा समतोल असणे ही तितकेच गरजेचे आहे. त्यासाठी पर्यावरणातील नैसर्गिक घटकांचे संवर्धन होणे आवश्यक आहे. आपल्या आजूबाजूला अनेक नैसर्गिक घटक असतात. त्यामध्ये हवा, पाणी, मृदा इ. दिवसेंदिवस वृक्षांची संख्या कमी होत चालली आहे. त्यासाठी सामाजिक स्तरावर वृक्षारोपण मोठया प्रमाणात करण्यासाठी गावातील लोकांनी सहभागी होणे अत्यंत आवश्यक आहे.

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपण करण्यासंदर्भात व सामाजिक जनजागृती होण्यासाठी आजी माजी स्वयंसेवकांनी पथनाटय सादर केले.





या कलाकारांच्या माध्यमातून आम्हाला याची जाणीव झाली की, आम्ही देखील अशा सामाजिक संदेश देण्या–या विविध कार्यक्रमांमध्ये सहभागी झाले पाहिजे जेणेकरून त्याचा फायदा समाजाला आणि या तरूण युवा पिढीला होईल.

अशा प्रकारे दि. २१/०२/२०२३ रोजी श्रमसंस्कार शिबिरातील वरील विशष उपक्रम व विविध कार्यक्रम पार पडले.

श्रमसंस्कार शिबिराचा तिसरा दिवस

दि. २२/०२/२०२३

आज दि. २२/०२/२०२३ रोजी सकाळी सर्व स्वयंसेवक बरोबर ०६. वा. शिबिरास्थळी उपस्थित होते. यावेळी महाविद्यालयातील इंग्रजी विभागाचे प्राध्यापक. डॉ. फिरोज शेख सर यांनी स्वयंसेवकांचा व्यायाम तसेच योगा करून घेतला. यावेळी त्यांनी आपले शरीर सुंदर, निरोगी कशाप्रकारे राहील व आपणास भविष्यात होणारे आजार कसे टाळता येतील आणि आपण आपल्या शरीराची व कुटुंबाची काळजी कशा पध्दतीने घेवू शकतो याची जाणीव करून दिली.






स्वयंसेवकांमधील दोन स्वयंसेवक स्टेज वर घेवून त्यांच्या मार्फत सर्व स्वयंसेवक सकाळी व्यायाम करत होते. व्यायाम आणि योगा करत असताना स्वयंसेवकामध्ये अतिशय उत्साह दिसून येत होता. यावेळी खूप आनंद घेत शिबिरातील सर्व स्वयंसेवक व्यायाम करत होते.

त्यानंतर शिबिरातील सर्व स्वयंसेवकांनी प्रार्थना घेवून सर्वांना चहा आणि नाष्टा यासाठी ०१ तास वेळ दिला.





सर्व स्वयंसेवकांचा नाष्टा झाल्यानंतर एक ग्रुप शिबिरस्थळी थांबला व उर्वरित पाच ग्रुपने बिजवडी मधील कारखान्याशेजारी जावून वृक्षांची आळी केली व रस्त्यालगत असणा—या झाडांची आळी करून स्वच्छता केली. तसेच सिंचन ड्रिपची व्यवस्था सुस्थितीत केली.











एकंदरीत स्वच्छता अभियानामध्ये गावातील ग्रामस्थ स्वत:हून सहभागी होवून त्यांनी देखील स्वयंसेवकांबरोबर काम केले.

स्वच्छता करत असताना शिबिरातील स्वयंसेवकांना खूप छान अनुभव आले. स्वच्छता करत असताना बिजवडी या गावातील ग्रामस्थांच्या खूप छान प्रतिक्रिया येत होत्या असे त्यांनी सांगितले. काही लोक स्वयंसेवकांबरोबर स्वच्छता करण्यास सहभागी झाले.

यादरम्यान सर्व स्वयंसेवकांना सांगण्यात आले की, जो ग्रुप अतिशय चांगली स्वच्छता करेल त्या ग्रुपचा नंबर काढण्यात येईल किंवा तो ग्रुप अतिशय चांगले काम करतो असे घोषित केले जाईल.





गवत, कचरा, प्लास्टिक, काटेरी झुडुपे तसेच झाडांच्या रस्त्यावर येणा—या फांद्या काढून त्या परिसराची स्वच्छता करण्यात आली. यादरम्यान रो.से.यो. योजनेतील स्वयंसेवकांचे केलेल्या विविध ग्रुपने ही स्वच्छता अतिशय मन लावून केली.

सदर स्वच्छता व झाडांना आळी करण्यासाठी स्वयंसेवकांनी डॉ. राजेंद्र साळुंखे, डॉ. गजानन कदम, प्रा. सौ. मनिषा गायकवाड, प्रा. मयूरी घोगरे, प्रा. शुभांगी वाघ, प्रा. सोमनाथ चव्हाण, प्रा. दर्शन दळवी, प्रा. प्रसाद कांबळे, प्रा. सिध्दार्थ चितारे, प्रा. भारत शेंडे, श्री. मयूर मखरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता अभियान राबविले.

जी.पी.एस. मॅपिंग :

इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय इंदापूर मधील भूगोल विभागाचे डॉ. आत्माराम फलफले आणि डॉ. संदीप शिंदे यांनी 'जीपीएस मॅपिंग' या विषयावर दिनांक 22/02/2023 रोजी दुपारी 3.00 ते 5.00 या वेळेत व्याख्यान आणि प्रशिक्षण दिले. या व्याख्यानामध्ये डॉ. आत्माराम फलफले यांनी अक्षवृत्ते, रेखावृत्ते, अक्षांश, रेखांश, विषुववृत्त आणि मूळ रेखावृत्त या मूळ संकल्पना समजावून सांगितल्या. तसेच या व्याख्यानामध्ये विद्यार्थ्यांच्या शंकांचे आणि प्रश्नांचे समाधान केले. या व्याख्यानाच्या दुसऱ्या सत्रामध्ये डॉ. संदीप शिंदे यांनी जीपीएस मॅपिंग करत असताना उपयोगी पडणाऱ्या जीपीएस उपकरणाची माहिती दिली. तसेच जीपीएस उपकरणाद्वारे स्थानांची माहिती गोळा करत असताना कोणती काळजी घ्यावी यासंदर्भाची माहितीही दिली.




यामध्ये कृत्रिम उपग्रह, जीपीएस रिसीव्हर, समुद्रसपाटीपासूनची उंची, अचूकता पातळी यांसारख्या संकल्पना विद्यार्थ्यांना समजावून सांगितल्या.

या व्याख्यानामध्ये मोबाईलचा आणि विविध ॲप्स यांचा वापर करून कशा पद्धतीने स्थानांची माहिती गोळा करता येते याचीही माहिती दिली.




जीपीएस मॅपिंग चा वापर विविध क्षेत्रांमध्ये म्हणजेच जमीन मोजणी, पाण्याची किंवा खनिज तेलाची पाईप लाईन सर्वेक्षण, भूरूपांचे मोजमाप, विविध प्राकृतिक आणि सांस्कृतिक भूरूपांच्या समस्या, पर्यावरणीय समस्या यांसारख्या क्षेत्रांमध्ये करण्यात येतो.

या कॅम्पमध्ये बिजवडी या गावातील दोन बंधारे आणि कर्मयोगी सहकारी साखर कारखाना बिजवडी या ठिकाणाचे जीपीएस मॅपिंग केले. त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| Indapur Taluka Shikshan Prasarak Mandal's<br>Arts Science and Commerce College in the Pur district Pune<br>Special Winter NSS Camp<br>Date:- 22/02/2023<br>GPS Mapping of Nearby Lake 1 | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Sr. no. | Longitude | Latitude | Altitude (m) | Accuracy Level (m) | Remark |
| 1 | 74.954473 | 18.152325 | 514 | 3.8 | P1 |
| 2 | 74.953427 | 18.154518 | 514 | 4.2 | P2 |
| 3 | 74.953508 | 18.154567 | 514 | 3.3 | P3 |
| 4 | 74.953224 | 18.155132 | 514 | 4.5 | P4 |
| 5 | 74.952858 | 18.154847 | 514 | 3.8 | P5 |
| 6 | 74.952832 | 18.154517 | 514 | 4.3 | P6 |
| 7 | 74.952848 | 18.154318 | 514 | 4.3 | P7 |
| 8 | 74.952704 | 18.154243 | 514 | 4.5 | P8 |
| 9 | 74.95266 | 18.154073 | 514 | 3.1 | P9 |
| 10 | 74.952766 | 18.15394 | 514 | 3.7 | P10 |
| 11 | 74.952708 | 18.153841 | 514 | 4.8 | P11 |
| 12 | 74.952568 | 18.153826 | 514 | 4.3 | P12 |
| 13 | 74.952442 | 18.1537 | 514 | 4.8 | P13 |
| 14 | 74.952619 | 18.153553 | 514 | 4.7 | P14 |
| 15 | 74.952181 | 18.152988 | 514 | 3.6 | P15 |
| 16 | 74.951126 | 18.152605 | 514 | 4.6 | P16 |
| 17 | 74.950829 | 18.152707 | 514 | 5.1 | P17 |
| 18 | 74.950793 | 18.152356 | 514 | 6.6 | P18 |
| 19 | 74.949986 | 18.152429 | 514 | 3.7 | P19 |
| 20 | 74.949987 | 18.152687 | 514 | 4.2 | P20 |
| 21 | 74.949454 | 18.153311 | 514 | 3.3 | P21 |
| 22 | 74.948297 | 18.154561 | 514 | 4.5 | P22 |
| 23 | 74.948052 | 18.15557 | 514 | 3.8 | P23 |
| 24 | 74.947428 | 18.155489 | 514 | 4.3 | P24 |
| 25 | 74.946723 | 18.15554 | 514 | 4.2 | P25 |
| 26 | 74.946388 | 18.155755 | 514 | 4.5 | P26 |
| 27 | 74.946285 | 18.155308 | 514 | 3.1 | P27 |
| 28 | 74.946517 | 18.155225 | 514 | 3.8 | P28 |
| 29 | 74.946456 | 18.154735 | 514 | 4.9 | P29 |
| 30 | 74.946571 | 18.154742 | 514 | 4.3 | P30 |
| 31 | 74.946665 | 18.15516 | 514 | 4.3 | P31 |
| 32 | 74.946978 | 18.155099 | 514 | 4.4 | P32 |
| 33 | 74.946962 | 18.154834 | 514 | 3.1 | P33 |
| 34 | 74.947588 | 18.154442 | 514 | 3.9 | P34 |
| 35 | 74.947989 | 18.152979 | 514 | 4.9 | P35 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 36 | 74.947662 | 18.152342 | 514 | 4.3 | P36 |
| 37 | 74.948209 | 18.152016 | 514 | 4.8 | P37 |
| 38 | 74.94819 | 18.151849 | 514 | 5 | P38 |
| 39 | 74.94834 | 18.15174 | 514 | 3.6 | P39 |
| 40 | 74.948306 | 18.151427 | 514 | 4.6 | P40 |
| 41 | 74.948511 | 18.151399 | 514 | 4.3 | P41 |
| 42 | 74.948719 | 18.151837 | 514 | 4.3 | P42 |
| 43 | 74.949622 | 18.151075 | 514 | 4.3 | P43 |
| 44 | 74.950363 | 18.151084 | 514 | 3.1 | P44 |
| 45 | 74.951051 | 18.151305 | 514 | 3.7 | P45 |
| 46 | 74.950438 | 18.150839 | 514 | 4.8 | P46 |
| 47 | 74.950229 | 18.150222 | 514 | 4.3 | P47 |
| 48 | 74.949812 | 18.149852 | 514 | 4.7 | P48 |
| 49 | 74.950289 | 18.149856 | 514 | 4.7 | P49 |
| 50 | 74.950656 | 18.149274 | 514 | 3.5 | P50 |
| 51 | 74.951257 | 18.148922 | 514 | 4.5 | P51 |
| 52 | 74.949839 | 18.148197 | 514 | 5.1 | P52 |
| 53 | 74.950364 | 18.147399 | 514 | 6 | P53 |
| 54 | 74.950311 | 18.146252 | 514 | 3.7 | P54 |
| 55 | 74.950466 | 18.146307 | 514 | 4.2 | P55 |
| 56 | 74.950544 | 18.148097 | 514 | 3.2 | P56 |
| 57 | 74.951579 | 18.148159 | 514 | 4.5 | P57 |
| 58 | 74.951554 | 18.147713 | 514 | 3.8 | P58 |
| 59 | 74.951817 | 18.147842 | 514 | 8.3 | P59 |
| 60 | 74.952179 | 18.147439 | 514 | 7.7 | P60 |
| 61 | 74.95297 | 18.147099 | 514 | 5.5 | P61 |
| 62 | 74.952316 | 18.147584 | 514 | 4 | P62 |
| 63 | 74.95204 | 18.14795 | 514 | 3.6 | P63 |
| 64 | 74.951975 | 18.14842 | 514 | 7.5 | P64 |
| 65 | 74.952418 | 18.148822 | 514 | 6.6 | P65 |
| 66 | 74.951273 | 18.149971 | 514 | 5.3 | P66 |
| 67 | 74.951588 | 18.150357 | 514 | 5.5 | P67 |
| 68 | 74.951696 | 18.150311 | 514 | 3.3 | P68 |
| 69 | 74.952273 | 18.150826 | 514 | 3.6 | P69 |
| 70 | 74.952632 | 18.150599 | 514 | 4.6 | P70 |
| 71 | 74.952935 | 18.150019 | 514 | 7.1 | P71 |
| 72 | 74.953619 | 18.149581 | 514 | 7 | P72 |
| 73 | 74.953416 | 18.149975 | 514 | 4.5 | P73 |
| 74 | 74.953187 | 18.150726 | 514 | 4.9 | P74 |
| 75 | 74.953602 | 18.151028 | 514 | 5.2 | P75 |
| 76 | 74.953888 | 18.150927 | 514 | 3.9 | P76 |
| 77 | 74.953667 | 18.151188 | 514 | 4.3 | P77 |
| 78 | 74.953298 | 18.151283 | 514 | 4.8 | P78 |
| 79 | 74.953253 | 18.151621 | 514 | 4.3 | P79 |
| 80 | 74.953541 | 18.152191 | 514 | 5.6 | P80 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 81 | 74.954179 | 18.152402 | 514 | 5.8 | P81 |

| Indapur Taluka Shikshan Prasarak Mandal's | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Arts Science and Commerce College in the Pur district Pune | | | | | |
| Special Winter NSS Camp | | | | | |
| Date:- 22/02/2023 | | | | | |
| GPS Mapping of Nearby Lake 2 | | | | | |
| | | | | | |
| Sr. no. | Longitude | Latitude | Altitude (m) | Accuracy Level (m) | Remark |
| 1 | 18.149317 | 74.972316 | 509 | 4.5 | L1 |
| 2 | 18.149262 | 74.967956 | 509 | 3.8 | L2 |
| 3 | 18.149287 | 74.967321 | 509 | 4.3 | L3 |
| 4 | 18.14838 | 74.96842 | 509 | 4.2 | L4 |
| 5 | 18.147898 | 74.967823 | 509 | 4.5 | L5 |
| 6 | 18.148128 | 74.966848 | 509 | 3.1 | L6 |
| 7 | 18.147851 | 74.966843 | 509 | 3.8 | L7 |
| 8 | 18.147537 | 74.96741 | 509 | 4.9 | L8 |
| 9 | 18.147536 | 74.969245 | 509 | 4.3 | L9 |
| 10 | 18.146983 | 74.969031 | 509 | 4.3 | L10 |
| 11 | 18.146417 | 74.967953 | 509 | 4.4 | L11 |
| 12 | 18.145426 | 74.967385 | 509 | 3.1 | L12 |
| 13 | 18.145547 | 74.966619 | 509 | 3.9 | L13 |
| 14 | 18.144758 | 74.96606 | 509 | 4.9 | L14 |
| 15 | 18.145088 | 74.96684 | 509 | 4.3 | L15 |
| 16 | 18.144954 | 74.967811 | 509 | 4.8 | L16 |
| 17 | 18.144 | 74.968296 | 509 | 4 | L17 |
| 18 | 18.144041 | 74.969778 | 509 | 3.6 | L18 |
| 19 | 18.143416 | 74.96969 | 509 | 4.6 | L19 |
| 20 | 18.143164 | 74.968219 | 509 | 4.3 | L20 |
| 21 | 18.142976 | 74.968963 | 509 | 4.3 | L21 |
| 22 | 18.14152 | 74.969388 | 509 | 4.5 | L22 |
| 23 | 18.142685 | 74.969441 | 509 | 3.8 | L23 |
| 24 | 18.142512 | 74.970154 | 509 | 4.3 | L24 |
| 25 | 18.143443 | 74.970688 | 509 | 4.2 | L25 |
| 26 | 18.144227 | 74.970497 | 509 | 4.4 | L26 |
| 27 | 18.145187 | 74.968751 | 509 | 3.1 | L27 |
| 28 | 18.145916 | 74.969486 | 509 | 3.9 | L28 |
| 29 | 18.146055 | 74.97034 | 509 | 4.9 | L29 |
| 30 | 18.144909 | 74.970838 | 509 | 4.3 | L30 |
| 31 | 18.14428 | 74.97149 | 509 | 4.8 | L31 |
| 32 | 18.142153 | 74.971662 | 509 | 5 | L32 |
| 33 | 18.144209 | 74.97208 | 509 | 3.6 | L33 |
| 34 | 18.1466 | 74.97114 | 509 | 4.6 | L34 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 35 | 18.147034 | 74.970385 | 509 | 4.3 | L35 |
| 36 | 18.14819 | 74.970934 | 509 | 4.3 | L36 |
| 37 | 18.14771 | 74.972818 | 509 | 4.5 | L37 |
| 38 | 18.147266 | 74.973025 | 509 | 6 | L38 |
| 39 | 18.147715 | 74.973136 | 509 | 3.6 | L39 |
| 40 | 18.147459 | 74.974 | 509 | 4.6 | L40 |
| 41 | 18.147998 | 74.973242 | 509 | 4.3 | L41 |
| 42 | 18.148412 | 74.972213 | 509 | 4.3 | L42 |

| Indapur Taluka Shikshan Prasarak Mandal's | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Arts Science and Commerce College in the Pur district Pune | | | | | |
| Special Winter NSS Camp | | | | | |
| Date:- 22/02/2023 | | | | | |
| GPS Mapping of Karmayogi Sugar Cooperative Limited | | | | | |
| Sr. no. | Longitude | Latitude | Altitude (m) | Accuracy Level (m) | Remark |
| 1 | 74.956037 | 18.138133 | 527 | 3.6 | C1 |
| 2 | 74.960397 | 18.137095 | 520 | 4.6 | C2 |
| 3 | 74.961432 | 18.138545 | 521 | 5.1 | C3 |
| 4 | 74.96278 | 18.141379 | 523 | 6.6 | C4 |
| 5 | 74.959522 | 18.142702 | 516 | 3.7 | C5 |
| 6 | 74.960088 | 18.143778 | 515 | 4.2 | C6 |
| 7 | 74.963542 | 18.142657 | 516 | 3.3 | C7 |
| 8 | 74.965613 | 18.148029 | 517 | 4.5 | C8 |
| 9 | 74.962439 | 18.149117 | 520 | 3.8 | C9 |
| 10 | 74.958627 | 18.142988 | 522 | 4.3 | C10 |
| 11 | 74.95669 | 18.140033 | 524 | 4.2 | C11 |

## डॉ. दिगंबर बिरादार : आम्ही घडू देशासाठी

राष्ट्रीय सेवा योजना श्रमसंस्कार शिबिराच्या निमित्ताने बिजवडी येथील कार्यक्रमाच्या दुस—या पुष्पामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. दिगंबर बिरादार होते. त्यांनी मार्गदर्शनाची सुरूवात साने गुरूजींच्या सुंदर अशा खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे या प्रार्थनेतून केली. आजचा प्रमुख विषय आम्ही घडू देशासाठी या विषयातून राष्ट्रनिर्मितीमध्ये कवींचे मोलाचे योगदान असते असे मत व्यक्त केले.






राष्ट्रीय धर्म हा विविधतेतून एकता आहे तसेच क्रांतीवीर राजगुरू, भगतसिंग, सुखदेव आदि क्रांतीका—यांच्या प्रेरणेतून युवक घडला जातो. त्यांच्याच प्रेरणेतून राष्ट्र प्रेमाची यवकांमध्ये उर्जा निर्माण होते. तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून युवकांचा मानसिक, शारिरीक व बौध्दिक विकास होतो असे प्रतिपादन त्यांनी केले.







धर्म आणि विज्ञान हे नाण्याच्या दोन बाजू आहेत म्हणून अध्यात्मक व विज्ञान युवक घडविण्यासाठी प्रामुख्याने या गोष्टीची मदत होते. भारतीय संविधानाच्या आत्मसातातून युवकांचा निश्चित विकास होवू शकतो. त्यामुळे संविधानाचे वाचन करणे तसेच समजून घेणे गरजेचे आहे. ध्येय, कृती व संयम या तीन बाबीच्या माध्यमातून युवकांचा सर्वांगीण विकास होतो. असे आपल्या मार्गदर्शनातून स्वयंसेवकांना समजून सांगून त्यांनी व्याख्यानाला पूर्ण विराम दिला.

तसेच यावेळी प्रा. सिध्दार्थ चितारे सरांनी कै. कर्मयोगी शंकरराव पाटील (भाऊ) यांच्या जीवनवर कविता सादर करून स्वयंसेवकांचे मन अचंबित केले. तसेच या कार्यक्रमामध्ये प्रा. सोमनाथ चव्हाण, निकिता काशीद यांनीही आपल्या स्वलिखित कविता सादर केल्या.

 

या कार्यक्रमामध्ये स्वयंसेवकांनी तसेच प्राध्यापकांनी चांगल्या प्रतिचा प्रतिसाद देवून हा कार्यक्रम यशस्वी केला.



या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. प्राजक्ता गुरगुडे व आभार कु. पुजा घाडगे यांनी केले. तर या कार्यक्रमास डॉ. राजेंद्र साळुंखे, डॉ. गजानन कदम, प्रा. सौ. मनिषा गायकवाड, प्रा. भारत शेंडे, प्रा. सौ. सुवर्णा जाधव, प्रा. शुभांगी वाघ, प्रा. दर्शन दळवी, प्रा. प्रसाद कांबळे, प्रा. मयूरी नलवडे, प्रा. मयूरी घोगरे, प्रा. सोमनाथ चव्हाण, प्रा. सिध्दार्थ चितारे, श्री. मयूर मखरे उपस्थित होते. सदर अहवाल लेखन प्रा. सोमनाथ चव्हाण यांनी केले.

## सूर्यकांत चव्हाण : संमोहन कार्यक्रम

मास्टर सूर्यकात चव्हाण सर यांचा संमोहन हा कार्यक्रम बिजवडी या गावात श्रमसंस्कार शिबिरामध्ये सायंकाळी ०७.३० वा. आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आलेले सुर्यकांत चव्हाण सर यांचा यावेळी कार्यक्रम अधिकारी डॉ. राजेंद्र साळुंखे यांच्या हस्ते एक रोपटे देवून सत्कार करण्यात आला.









मास्टर सूर्यकांत चव्हाण सर यांनी संमोहन हा कार्यक्रम सुरू करण्याअगोदर काही सूचना दिल्या आणि त्यांच्या संमोहन या कार्यक्रमास सुरूवात केली . यावेळी ते म्हणाले की, स्वयंसेवकांचे स्टेज डेअरिंग वाढविण्यासाठी, त्यांच्या मानसिकतेमध्ये कशाप्रकारचे बदल होतात, त्याचे परिणाम काय होतात हे आपण यावेळी पाहणार आहोत.





सर्वप्रथम स्वयंसेवकांना स्वत:च्या कपाळाच्या मध्यभागी बघायला सांगितले विद्यार्थी या प्रक्रियेसाठी सज्ज झाले. ही प्रक्रिया करत असताना त्यानी सुंदर असे गाणे लावायला सांगितले आणि चव्हाण सरांनी आदेश दिला की, आपण दोन्ही भुवईच्या मध्यभागी बघावे असे सांगितले. काही मिनिटांमध्ये तुम्ही आता झोपणार आहात. आता तुम्हाला तुमच्या डोळयाच्या पापण्या जड होताना दिसतील. सरांनी एक ते दहा अंक मोजण्यास सुरूवात केली. काही अंक मोजताच डोळे बंद होताना दिसतात.





यानंतर त्यांनी विद्यार्थ्यांचे डोळे बंद होत आहेत आणि याचा तुमच्या डोळयावर प्रचंड ताण येणार आहे. उलटे अंक मोजताना जसेजसे अंक कमी होत जातील तसतसे ताण वाढत होता. आणि काही काळानंतर विद्यार्थी गाढ झोपी गेले.





पुढे त्यांनी सांगितले जोपर्यंत एक ते दहा अंक मोजत नाही तोपर्यंत असेच मनाच्या गाढ अवस्थेत झोपेत आहात. तुमचे प्रंचड प्रमाणात स्टेजडेअरिंग वाढले आहे, तुम्ही आता छान भाषण देवू शकता, छान नृत्य करू शकता असे सांगून विविध प्रकारचे संमोहनाचे प्रयोग करून दाखवले.

काही वेळानंतर इथून पुढे कार्यक्रम गणपतीच्या आरतीने हा कार्यक्रम सुरू होणार आहे. गणेशाची आरती सुरू होणार आहे त्यांनतर एक ते तीन अंक म्हणताच तुम्ही गणेशाची आरती सुरू करणार आहात.





अंक मोजताच सर्वजण जागे होतील आणि सर्वजण आपल्या जागेवरती उभे राहतील दोन बोलताच सर्वांचे हात वरती घेवून आरती घेणार आहेत. आणि तीन म्हणताच सर्वजण आरतीसाठी तयार झाले आणि आरती चालू केली. खरे त्यांना काही समजत नव्हते कारण ते संमोहित झाले होते.

त्यानंतर त्यांनी त्यांच्या विशिष्ट शैलीमध्ये गणपती विसर्जन कार्यक्रम डान्स, संमोहित केल्यावर व्यायाम करणे, बॉडी शो, अंगात येणे, रडणा–या बाळाला समजावून सांगतानाचा क्षण, लावणी करणे, मधमाशा चावल्या आहेत असा भास झाला हे जाणवून देणे अशा विविध प्रयोगांद्वारे सरांनी प्रत्यक्षात प्रात्यक्षिके घेवून स्वयंसेवकांचे मनोरंजन करण्याचे काम केले. हे करत असताना त्यांनी मार्गदर्शन देखील केले.





शेवटी सरांनी संमोहन म्हणजे नेमके काय, ते कशासाठी केले जाते अशा विविध प्रश्नावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. ते म्हणाले की, हा उपक्रम कोणीही घरी करू नये. अशाप्रकारे त्यांनी शिबिरातील सर्व स्वयंसेवक तसेच बिजवडी या गावातील ग्रामस्थांना आव्हान केले व या कार्यक्रमाला बोलावून सेवा करण्याची संधी दिली त्याबद्दल आभार मानले व प्रार्थना घेवून कार्यक्रमाची सांगता केली.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे आभार डॉ. राजेंद्र साळुंखे यांनी मानले.

## बिजवडी या गावामध्ये आठवडे बाजार याठिकाणी श्रमसंस्कार शिबिरातील स्वयंसेवकांनी सादर केलेले पथनाट्य

मतदान जनजागृती, अंधश्रध्दा निर्मूलन, व्यसनमुक्ती व रक्तदान शिबिर या विविध विषयांवतरती शिबिरातील स्वयंसेवकांनी बिजवडी या गावात आठवडे बाजार याठिकणी पथनाटयाद्वारे जनजागृती केली.

तसेच स्वयंसेवकांनी शिबिरस्थळापासून बिजवडी या गावातील आठवडे बाजार या ठिकाणापर्यंत घोषणा देत रॅली काढली. ग्रामस्थांना विविध विषयांच्या माध्यमातून जनजागृती केली.
















**श्री. संतोष नरूटे : मिमिक्री व पथनाटय सादरीकरण**

सायंकाळील सत्रात राष्ट्रीय सेवा योजनेचे माजी स्वयंसेवक मा. श्री. संतोष नरूटे हे या सत्रात उपस्थित होते. त्यांनी विविध प्रकारचे प्राणी, पक्षी, मोटारसायकल, चित्रपटातील अभिनेत्यांचे आवाज तसेच डायलॉग सादर केले.

तसेच शिबिरातील सर्व स्वयंसेवकांना स्वयंसेवक कसा असावा याबद्दल मोलाचे मार्गदर्शन केले.







## श्रमसंस्कार शिबिराचा आज चौथा दिवस

दि. २३/०२/२०२३

आज दि. २३/०२/२०२३ रोजी सकाळी सर्व स्वयंसेवक बरोबर ०६. वा. शिबिरास्थळी उपस्थित होते. यावेळी डॉ. फिरोज शेख व श्रमसंस्कार शिबिरातील शिवम चव्हाण यांनी योगा, व्यायाम व प्राणायमे करून घेतली. आपले शरीर सुंदर, निरोगी कशाप्रकारे राहील व आपणास भविष्यात होणारे आजार कसे टाळता येतील आणि आपण आपल्या शरीराची व कुटुंबाची काळजी कशा पध्दतीने घेवू शकतो याची जाणीव करून दिली.






 

चहा व नाष्टा करताना स्वयंसेवक



**स्वच्छता :**

त्यानंतर सर्व स्वयंसेवक स्वच्छता अभियान हा कार्यक्रम राबविण्यासाठी बिजवडी या गावात वेगवेगळया ठिकाणी गेले. स्वयंसेवकांनी सकाळच्या सत्रात कर्मयोगी शंकरराव पाटील सह. साखर कारखाना या ठिकाणी स्वच्छता करण्याचे काम केले. तसेच झाडांना आळी तयार करून श्रमदान केले. तसेच संरक्षक भिंती लगत असणारे सर्व झाडे व कचरा साफ करून झाडांना आळी तयार करण्याचे काम स्वयंसेवकांनी केले.













स्वच्छता अभियान हा उपक्रम झाल्यानंतर सर्व स्वयंसेवक शिबिरस्थळी रवाना झाले. त्यानंतर सर्वांची हजेरी घेण्यात आली.

**प्रतिक शिंदे :**

दुपारी सत्रात मा. प्रतिक शिंदे यांचे व्यवसायाच्या वाटा या विषयावर शिबिरातील स्वयंसेवकांसाठी व्याख्यानाचे आयोजन केले होते. यावेळी त्यांनी आपल्या व्याख्यानामध्ये असे म्हटले की, ग्रेट स्पर्धक म्हणून जो पुढे येईल तोच या स्पर्धात्मक क्षेत्रात उत्कृष्ट चा मानक ठरेल असे सांगून स्वयंसेवकांना प्रश्न विचारण्यास प्रवृत्त केले. जेणेकरून विद्यार्थी हे बोलते राहिले पाहिजेत. त्यांच्यामध्ये स्टेज डेअरिंग निमार्ण झाले पाहिजेत असे मत व्यक्त केले.





तसेच त्यांनी विद्यार्थ्यांना डू परपज प्लॅनिंग फॉर करिअर या विषयी माहिती सांगून दैनंदिन बौध्दिक विकास होण्यासाठी शिक्षण हे गरजेचे असते त्याचबरोबर स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी माणसाने स्वत:चा व्यवसाय निर्माण कसा करावा याबद्दल सविस्तर अशी माहिती त्यांनी स्वयंसेवकांना दिली.

त्यांच्या या सांगण्यावरून काही स्वयंसेवकांनी हजरजबाबीपण दाखवून शिक्षण घेत असतानाच व्यवसायाचे नियोजन करून आपण त्यामध्ये कसे आपले अस्तित्व निर्माण केले मत स्वयंसेवकांनी व्यक्त केले. हे ऐकून त्यांनी बाकीच्या स्वयंसेवकांना त्यांच्याकडून प्रेरणा घेण्यासाठी सांगितले.

यावेळी त्यांनी त्यांच्या व्यवसायाच्या वाटा या व्याख्यानामध्ये सर्व स्वयंसेवकांना आणि इतर सर्वांना महत्वाचा नियम सांगितला तो म्हणजे ७२ तास २१ दिवस आणि ९०

दिवस यामध्ये ७२ तास याचे विश्लेषण करताना समजून घेणे आणि प्रयत्न करणे याबद्दल माहिती दिली. २१ दिवस म्हणजे आपण कोणतीही गोष्ट २१ दिवस सलग न चुकता केली तर आपण २२ व्या दिवशी ती गोष्ट परफेक्ट होईल म्हणजेच ती एक प्रकारची आपली सवय बनून जाईल. ९० दिवसामध्ये आपण जे काम २१ दिवसामध्ये केले तेच काम जर आपण ९० दिवसामध्ये केले तर ते काम आपली जीवनशैली होवून जाते.





तसेच त्यांनी आलेली संधी कधीही गमवायची नाही आणि संधी यायची देखील वाट पाहायची नाही तर ती आपण निर्माण करायची असते हे सांगून आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी डॉ. राजेंद्र साळुंखे, प्रा. सौ. मनिषा गायकवाड, प्रा. सोमनाथ चव्हाण, प्रा. मयूरी नलवडे, प्रा. मयूरी घोगरे, प्रा. निखिता कुंभार इ. प्राध्यापक व स्वयंसेवक उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. स्वप्नाली गायकवाड हिने केल तर आभार डॉ. राजेंद्र साळुंखे यांनी मानले.

**डॉ. राजाराम गावडे : संत गाडगे महाराज स्वच्छता अभियान रा.से.यो एक आजचा युवक**

दुपारील सत्रात कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख डॉ. राजाराम गावडे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान व आजचा युवक या विषयावर स्वयंसेवकांना मार्गदर्शन करतेवेळी गाडगेबाबा यांचा उदाहरणासह सुंदर असा परिचय दिला. अंधश्रध्दा कशी असते ती गाडेगाबाबांनी किर्तनातून कशा पध्दतीने मोडीत काढण्याचा प्रयत्न केला. त्यांनी आपल्या भाषणातून असे मत व्यक्त केले. संतांनी अत्यंत अध्यात्मिक विचारांची समाजामध्ये पेरणी केली. गाडगेबाबा यांच्या गळयामध्ये कवडेची माळ आहे ती का व कशी आहे. त्यांनी त्या प्रसंगातून स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. स्वच्छता समाजासाठी किती महत्वाची आहे ते त्यांच्या कार्यातून आपल्याला दिसून येते.












अंधश्रध्देच्या माध्यमातून विविध प्रकारचे आजार पसरतात हे त्यांच्या लक्षात येताच त्यांनी गाव स्वच्छता करण्याची माहिम हाती घेवून गाव, नद्या, सार्वजनिक ठिकाणे स्वच्छता करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी आपल्या भाषणातून हे ही प्रतिपादन केले की तुमच्या देवाला स्वतःचे संरक्षण करता येत नाही तर तो तुमचे खाक काय करणार अशा पध्दतीने अंधश्रध्दा पासून समाजाला दूर लोटावयाचे काम केले.







यावेळी डॉ. राजेंद्र साळुंखे, डॉ. राजेंद्र भासेले, डॉ. बाळासाहेब काळे, प्रा. विद्या गायकवाड, प्रा. मनिषा गायकवाड, प्रा. श्रीनिवास शिंदे, प्रा. मयूरी घोगरे, प्रा. शुभांगी वाघ, प्रा. सोमनाथ चव्हाण व स्वयंसेवक उपस्थित होते.







सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. पुजा काळेल हिने केले तर आभार कु. प्रतिक्षा भानवसे हिन मानले.

डॉ. राजेंद्र भोसले : माती आणि पाणी परीक्षण

दि. २३/०२/२०२३ रोजी सकाळी ८ ते सायं. ५ यादरम्यान रासेयो शिबिरातील स्वयंसेवकांनी मौजे बिजवडी गाव व साखर कारखाना वसाहत परिसरातील ६५ ठिकाणाचे पिण्याचे पाण्याचे नमुने तपासले. या तपासणीमध्ये स्वयंसेवकांनी त्या पाण्याचा साम व टी. डी.एस या दोन घटकांची तपासणी केली.



सर्वेक्षण करण्यापूर्वी पिण्याच्या पाण्याचे सर्वेक्षण कसे करायचे? पाण्यातील कोणते घटक मोजायचे? व त्या घटकांचा मानवी आरोग्यावर काय परिणाम होतो या विषयी रसायनशास्त्र विभागातील प्रा. डॉ. राजेंद्र भोसले यांनी स्वयंसेवकांना सविस्तर माहिती दिली.

सदर सर्वेक्षणामध्ये प्रत्येक कुटुंबाचा पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत, त्या पाण्याचा PH व TDS या तीन घटकांचा अभ्यास केला गेला.

सर्वेक्षणातील टक्केवारी खालील तक्त्यामध्ये दर्शविली आहे.

| पाण्याचा स्त्रोत | पाण्यातील विद्राव्य क्षार TDS | सामू PH |
| --- | --- | --- |
| फिल्टर | ५० — १०० | ६.५ — ७.५ |
| जार | ५० — ७७ | ६.५ — ७.५ |
| बिसलरी | १०० — १२५ | ६.५ — ८.५ |
| बोअर | ७०० — ८०० | ७.५ — ८.५ |
| विहिर | ५५० — ६०० | ६.५ — ८.५ |
| वॉटर सप्लाय युनिट | ४५० — ६०० | ६.५ — ८.५ |

डब्लू. एच. ओ. व आय. सी. एम. आर. च्या मतानुसार पिण्याचा पाण्याचा सामू हा ६.५ ते ८.५ व टीडीएस हा ५० व १०० च्या दरम्यान असावा लागतो. पिण्याच्या पाण्यात टी.डी.एस क्षाराचे प्रमाण हे जास्त असेल तर भविष्यामध्ये किडनी स्टोन सारखा गंभीर आजार होण्याचा धोका असतो. असे पाण्यामार्फत पसरणारे आजार होवू नयेत म्हणून नागरिकांनी पाणी उकळून व गाळून प्यावे. तसेच ब्लिचिंग पावडर, तुरटी, मेडिक्लोरएम यासारख्या औषधाचा वापर करावा असा सल्ला देण्यात आला.

**इतिहास लेखन : प्रा. विद्या गायकवाड, डॉ. बाळासाहेब काळे, प्रा. दिक्षा बोंगाणे**

दुपारील सत्रात कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयातील इतिहास विभागामार्फत हिवाळी श्रमसंस्कार शिबिरामध्ये बिजवडी या गावचा ऐतिहासिक सर्वे करण्यात आला. या सर्वेची सुरूवात कर्मयागी शंकरराव पाटील सह. साखर कारखाना येथून झाली. त्यांनतर या सर्वेमध्ये विविध ठिकाणांची ऐतिहासिक माहिती देण्यात आली.

सर्वप्रथम बिजवडी या गावचा इतिहास जाणून घेतला तो असा आहे की खूप वर्षापूर्वी या ठिकाणी गाव नव्हते. त्याठिकाणी फक्त झाडे, जंगले होती. ही झाडे बिजातून अचानक बाहेर आली म्हणून या गावाला बिजवडी असे नाव देण्यात आले. अशी एक दंतकथा ऐकण्यास मिळाली आहे.

**मारूती मंदिर** : या बिजवडी गावातील मारूती मंदिर हे प्राचीन होते. हे हेमाडपंथी शैलीतील मंदिर होते. परंतु आता या मंदिराच जीर्णोध्दार झाला आहे. या मंदिराच्या समारे एक डिकमल व दोन दगड गोटे आहेत. एक लहान व एक मोठा असा आहे.




OPPO A55

**महादेव मंदिर** : मारूती मंदिराच्या शेजारीच महादेव मंदिर आहे. या मंदिरातील महादेवाची पिंड ही पुरातन आहे. परंतु त्याचे मंदिर आता बांधलेले आहे. महादेव मंदिराच्या शेजारी दोन मोठया विरगळी आहेत. या विरगळींवरती युध्दातील पराक्रमी वीर खालच्या बाजूला (बहुतेक ते पानीपतचे तिसरे युध्द असावे. १७६१) मध्यभागी दोन अप्सरा मनुष्याला स्वर्गात घेवून चाललेल्या आहेत. वरच्या बाजूला वैकुंठात महादेवाची भक्ती चाललेली आहे. तर सर्वात वरती चंद्र व सूर्य अशी रचना या दोन विरगळींची आहे. मारूती मंदिराच्या समोर व महादेव मंदिराच्या पाठीमागे एक खूप मोठे व खूप जुने चिंचेचे झाड आहे.






**ऐतिहासिक विहिर** : ही विहिर खूप जुनी आहे. खाजगी मालकीची आहे. या विहिरीला दोन मोटांची सुविधा आहे. तसेच पाटही आणि राहटही आहेत. आधीच्या काळात याच विहिरीवरून गावासाठी पाणी पुरवठा होत होता. या विहिरीच्या शेजारी एक पिंड आहे. या पिंडीचे एक वैशिष्टय म्हणजे ही पिंड विष्णूची आहे कारण पिंडीची रचना ही चौकोनी आकाराची आहे.



**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बिजवडी** : या शाळेची स्थापना १९५४ ची आहे. परंतु सन २००२ ते २००३ यावळेस या शाळेची पुर्नस्थापना करण्यात आली. अगोदर ही शाळा मारूती मंदिराच्या शेजारी होती. परंतु आता तिचे विस्थापन करण्यात आले आहे.

ग्रामपंचायत : बिजवडी, राजवडी, वनगळी, गागरगाव व पोंदकुलवाडी या पाच गावांचा ग्रुप ग्रामपंचायत बिजवडी या मार्फत कारभार पाहिला जातो. बिजवडी या गावची लोकसंख्या ३३६९ एवढी २०११ च्या जनगणनेनुसार आहे. या गावातील कॉलनीतील प्रत्येक घरावर सर्वे नंबर आहेत. कारण या गावात राहणारे लोक कारखान्यातील कर्मचारी आहेत. सध्याचे बिजवडी गावचे सरपंच सौ. कोमल कचरे या आहेत. या गावात चव्हाण, सातव आणि कोकणे या आडनावाची माणसे आहेत.

**शेती व पिके :**

या गावात साधारणत: ऊस हे पिक घेतले जाते. तसेच भाज्यांमध्ये टोमॅटो व ढोबळी मिरची इ. पिके घेतली जातात.

सदर इतिहास लेखनावेळी इतिहास विभागाच्या विभागप्रमुख प्रा. विद्या गायकवाड, डॉ. बाळासाहेब काळे, प्रा. दिक्षा बोंगाणे, प्रा. सोमनाथ चव्हाण व शिबिरातील सर्व स्वयंसेवक यांनी बिजवडी या गावाचा इतिहास जाणून घेतला

**किर्तनातून प्रबोधन :**

ह.भ.प कुमार महाराज शिंदे यांच्या किर्तनाने झाला. राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांमध्ये अध्यात्माचे महत्व रूजावे तसेच त्यांचे प्रबोधन व्हावे या उद्देशाने किर्तनाचे आयोजन केले होते. यावेळी त्यांनी भक्ती, प्रेम आणि ज्ञान या तीन गोष्टींचे विश्लेषण करून स्वयंसेवकांसमोर किर्तनातून प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला. त्याचबरोबर छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी मावळयांची असेलेली भक्ती आणि निष्ठा ऐतिहासिक गोष्टींचा आढावा घेत माहिती देण्याचा प्रयत्न केला. त्याचबरोबर जीवनातील संघर्ष, यश –अपयश याचे जीवनातील महत्व सांगितले. किर्तनकाराने अतिशय खुमासदार शैलीत हरिनामाचे महत्व पटवून दिले. त्याचबरोबर संतांच्या अभंगामधून व्यक्त होणारा मानवतावाद स्पष्ट केला. माणसाने माणसाला माणसाची रित द्यावी, माणसाने माणसाला माणसाची प्रित द्यावी ही संताची शिकवण त्यांनी आपल्या किर्तनातून मांडली.





महाराष्ट्रातील संतांनी समाजप्रबोधनासाठी केलेले कार्य याची माहिती किर्तनाद्वारे मांडण्याचा प्रयत्न केला. यामध्ये संत तुकाराम, संत एकनाथ, संत कान्होपात्रा आदि संतांनी त्यांच्या जीवनात समाजासाठी केलेले कार्य याविषयी माहिती दिली.

आजच्या युगामध्ये विज्ञान आणि अध्यात्म यांची सांगड घालून वाटचाल करणे आवश्यक आहे. कारण आजची हरवत चाललेली नैतिकता, मानवता परत मिळवायची असेल तर अध्यात्माशिवाय पर्याय नाही. त्यामुळेच शिबिरातील स्वयंसेवकांमध्ये विज्ञान आणि अध्यात्म या दोन्हींचा मेळ घातला गेला पाहिजे. याआधारे गाव, समाज, राज्य व राष्ट्र उन्नतीच्या दिशेने नेण्यासाठी असे तरूण निर्माण होणे गरजेचे आहे आणि ही गरज अशा किर्तनातून नक्कीच पूर्ण होईल याबाबत शंका नाही.

## श्रमसंस्कार शिबिराचा पाचवा दिवस

दि. २४/०२/२०२३

आज दि. २४/०२/२०२२ रोजी सकाळी सर्व स्वयंसेवक बरोबर ०६. वा. शिबिरास्थळी उपस्थित होते. डॉ. फिरोज शेख यांनी स्वयंसेवकांचा व्यायाम तसेच योगा करून घेतला. यावेळी त्यांनी आपले शरीर सुंदर, निरोगी कशाप्रकारे राहील व आपणास भविष्यात होणारे आजार कसे टाळता येतील आणि आपण आपल्या शरीराची व कुटुंबाची काळजी कशा पध्दतीने घेवू शकतो याची जाणीव करून दिली.









# आर्थिक व सामाजिक सर्वेक्षण

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे, कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, इंदापूर राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हिवाळी श्रमसंस्कार शिबिर या अंतर्गत आज दि. २४/०२/२०२३ रोजी अर्थशास्त्र विभागामार्फत सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण या उपक्रमाचे आयोजन बिजवडी या गावात करण्यात आले होते.

यामध्ये गावातील सर्व सामाजिक समस्या काय आहेत व त्या कशाप्रकारे सोडविल्या जातील याचा स्वयंसेवकांनी आढावा घेतला. तसेच कोरोना महामारीचा सर्वे करताना घरोघरी जावून बिजवडी या गावातील लोकांना कोरोन प्रतिबंधक लसीचे दोन डोस घेतले आहेत का हे विचारले. ज्यांनी दोन डोस घेतले नसतील त्यांना दोन्ही डोस घेण्याचे आवाहन केले.





तसेच कोरोना काळात तुम्हाला कोणत्या समस्यांचा सामना करावा लागला याचा आढावा घेतला व भविष्यात जर एखादे संकट आपल्या देशावर किंवा जगावर आले तर त्यावेळी कोणत्या उपाययोजना राबविता येतील याविषयी बिजवडी या गावातील ग्रामस्थांशी चर्चा केली.

या सर्वेक्षणासाठी अर्थशास्त्र विभागाचे डॉ. तानाजी कसबे, प्रा. अमोल थोरात, प्रा. अक्काबाई श्रीराम यांना स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.

**श्री. अमोल राऊत : कौशल्य विकास आणि प्रात्यक्षिक**

राष्ट्रीय सेवा योजना हिवाळी शिबिरामध्ये कौशल्य विकास आणि प्रात्यक्षिक या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी जावेद हबीब अॅकॅडमीचे मा. श्री. अमोल राऊत यांचे दुपारच्या सत्रात व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. स्वयंसेवकांना मार्गदर्शन करताना श्री. अमोल राऊत म्हणाले की, आम्ही जावेद हबीब अॅकॅडमी मार्फत १५०० महिलांना प्रशिक्षण दिल्याचे सांगितले. याचबरोबर १००० महिलांना रोजगार निर्माण करून दिला. शिक्षणाबरोबरच आमचा हा कोर्स करा व स्वत:च्या पायावर उभे रहा असा सल्ला दिला. आमचा ब्युटी पार्लर, हेअर कट, कलर कोर्स पूर्ण केल्यानंतर तुम्ही लेडिज शॉपी, ब्युटी पार्लर, लेडिज ड्रेस शिलाई इ. कोर्स करून महिन्याला २२ हजार ते २५ हजार रूपये कमवू शकता असे सांगितले.





त्यावेळी या कोर्सची माहिती देताना ते म्हणाले की, चेहरा व केस यांचा संबंध आपल्या आहारावर अवलंबून असतो. केसांची काळजी कशी घ्यावी हे आम्ही शिकवितो. हेअर कटचे प्रकार वेगवेगळे आहेत. त्यानुसार हेअर कलर चे सुध्दा प्रशिक्षण दिले जाते.

आमचा जावेद हबीब अ‍ॅकॅडमी चा कोर्स सहा महिन्याचा आहे असे त्यांनी यावेळी सांगितले. चेह—यावर वांग का येतो? उन्हामध्ये गेल्यावर चेहरा का काळवंडतो? झोपण्यापूर्वी चेहरा पाण्याने स्वच्छ धुतला पाहिजे. शांपूचे वेगवेगळे प्रकार आहेत. त्यानुसार शांपूचा वापर केला पाहिजे इ. माहिती त्यांनी यावेळी स्वयंसेवकांना दिली. आम्ही समाजातील गरीब व गरजू मुलांना ५० टक्के सवलतीमध्ये प्रशिक्षण देतो. त्यांना फी मध्ये सवलत दिली जाते.





लेडिज हेअर कट मध्ये एका महिलेला ५ ते ७ मिनिटात आम्ही ३७५ ते ५०० रू घेतो असे त्यांनी योवेळी सांगितले. डॉ. राजेंद्र साळुंखे यांनी श्री. राऊत यांना प्रश्न विचारला त्यांनी उत्तरे दिली. डेमो मध्ये ०२ स्वयंसेविकांनी व प्रा. मनिषा गायकवाड यांचा हेअर कट त्यांनी करून दाखविला.












यावेळी डॉ. राजेंद्र साळुंखे, प्रा. मनिषा गायकवाड, प्रा. सुवर्णा जाधव, प्रा. श्रीराम अक्काबाई, प्रा. सोमनाथ चव्हाण, प्रा. भारत शेंडे, आणि शिबिरातील स्वयंसेवक उपस्थित होते. अहवाल लेखन मराठी विभागाचे डॉ. राजकुमार शेलार यांनी केले.

## स्टेज डेअरिंग :

### विचार क्षमता तसेच मनोरंजन कार्यक्रम

या कार्यक्रमामध्ये एक बॉक्समध्ये जवळ जवळ ४० ते ५० चिट होत्या. त्या प्रत्येक चिट वरती वेगवेगळे महत्वाचे विषय होते. ज्या विद्यार्थ्याला ज्या विषयाची चिट येईल त्या विद्यार्थ्यांने स्टेजवरती येवून त्या विषयावर ०५ मि. बोलण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून आम्ही एखादया विषयावर काहीही न वाचता किती, काय, कसे बोलू शकतो हे समजले. तसेच विद्यार्थ्यांमध्ये आकलन क्षमता वाढण्यास आणि स्टेज डेअरिंग वाढण्यास कशी मदत झाली हे सांगितले.









# श्रमसंस्कार शिबिराचा सहावा दिवस

दि. २५/०२/२०२३

आज दि. २५/०२/२०२३ रोजी सकाळी सर्व स्वयंसेवक बरोबर ०६. वा. शिबिरास्थळी उपस्थित होते. डॉ. फिरोज शेख यांनी स्वयंसेवकांचा व्यायाम तसेच योगा करून घेतला. यावेळी त्यांनी आपले शरीर सुंदर, निरोगी कशाप्रकारे राहील व आपणास भविष्यात होणारे आजार कसे टाळता येतील आणि आपण आपल्या शरीराची व कुटुंबाची काळजी कशा पध्दतीने घेवू शकतो याची जाणीव करून दिली.



स्वयंसेवकांमधील दोन स्वयंसेवक स्टेज वर घेवून त्यांच्या मार्फत सर्व स्वयंसेवक सकाळी व्यायाम करत होते. व्यायाम आणि योगा करत असताना स्वयंसेवकामध्ये अतिशय उत्साह दिसून येत होता. यावेळी खूप आनंद घेत शिबिरातील सर्व स्वयंसेवक व्यायाम करत होते.

## कर्मयोगी शंकरराव पाटील सहकारी साखर कारखाना : स्वयंसेवकांची शैक्षणिक भेट

राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांना सहकार क्षेत्राचे महत्व कळावे यासाठी रासेयो विभागातील कार्यक्रम अधिकारी यांनी स्वयंसेवकांना कर्मयोगी शंकरराव पाटील सह. साखर कारखाना बिजवडी येथे शैक्षणिक अभ्यासासाठी भेट दिली. यातून रासेयो चा हेतू एवढाच होता की, स्वयंसेवकांना कळावे की, कर्मयोगी शंकरराव पाटील यांनी ग्रामीण भागाचा विकास व्हावा यासाठी बिजवडी सारख्या ग्रामीण भागात सहकारी साखर उभा केला.





याठिकाणी स्वयंसेवकांनी भेट देत असताना त्यांचे तीन ग्रुप करण्यात आले. त्या सहकारी साखर कारखान्यातील विविध ठिकाणचे कामकाज कसे चालते याची माहिती देण्यासाठी श्री. बिभिषण पराडे यांनी मदत केली. स्वयंसेवकांना गाळप प्रक्रियेपासून साखर कशी तयार होते याची माहिती सांगितली. ब्लोअर विषयी माहिती सांगितली. मळीद्वारे ब्लोअर कसा पेटवला जातो हे सांगितले.

कारखान्याचे एम.डी. मा. श्री. लोकरे साहेब यांना स्वयंसेविकेने प्रश्न विचारला की, तुम्ही शिक्षणाच्या पात्रतेवर याठिकाणी काम देता का, तेव्हा साहेब म्हणाले की कर्मचारी जरी असले तरी त्यांना शिक्षण महत्वाचे आहे. कारण या कारखान्यात जे काम चालते ते पूर्ण काम तंत्रज्ञानावर चालते. ते म्हणाले आम्ही पदवी, पदव्युत्तर, इंजिनिअरिंग किंवा तंत्रज्ञानात जे पारंगत असतात आम्ही त्यांना ते काम देतो.

यानंतर कारखान्याचे संचालक प्रा. सतिश व्यवहारे यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले की, विद्यार्थ्यांनी नोकरीच्या पाठीमागे न लागता व्यावसायाकडे लक्ष केंद्रित करावे. तुम्ही ही स्वत: नोकर होण्यापेक्षा काम देणारे बनू शकता असे मत व्यक्त केले.





यावेळी एम.डी. लोकरे साहेब, संचालक सतिश व्यवहारे व कारखान्याचे संचालक मंडळ रासेयो मधील कार्यक्रम अधिकारी आणि सर्व प्राध्यापक व स्वयंसेवक उपस्थित होते.



डॉ. संजय मोरे : रा.से.यो. व आजचा युवक

दुपारील सत्रातील व्याख्यानाचे प्रमुख पाहुणे म्हणून श्री. शिवाजी महाविद्यालय बावडा येथील रासेयो पुणे जिल्हा समन्वयक डॉ. संजय मोरे यांनी स्वयंसेवकांना रासेयो व आजचा युवक याविषयावर मार्गदर्शन केले.

यावेळी बोलताना ते म्हणाले की, युवकांनी वेळेला महत्व दिले पाहिजे. वेळेचा सद्पयोग करून यश संपादन केले पाहिजे. याचे उदाहरण सांगताना त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जीवनातील घटना सांगितली.





आजचा युवक कसा असावा तर तो छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सारखा स्वयंपूर्ण असावा आणि असा युवक तयार होण्यासाठी रासेयो आपणाला योग्य असे मार्गर्शन करते. म्हणून प्रत्येक युवकाने महाविद्यालयीन जीवनामध्ये रासेयो मध्ये सहभाग घेवून आपल्या जीवनाला योग्य अशी दिशा द्यावी आणि यश संपादन करावे असे मत व्यक्त केले.

यावेळी प्रा. मनिषा गायकवाड, प्रा. भारत शेंडे, डॉ. राजकुमार शेलार, प्रा. शुभांगी वाघ आणि शिबिरातील स्वयंसेवक उपस्थित होते.

## सायंकाळाचे सत्र : मा. अनिल केंगार यांचे भारूड

युवा भारूडकार श्री. अनिल शिवाजी केंगार मु. घुलेनगर, पो. पाणिव, ता. माळशिरस, जि. सोलापूर यांनी समाजप्रबोधनपर भारूडाचा कार्यक्रम स्वयंसेवक व ग्रामस्थांसाठी सादर केला. या कार्यक्रमाची सुरूवात नमन, गण, गवळण यांनी झाली. पारंपारिक वेशभूषेच्या माध्यमातून अधंश्रध्देखाली दडपलेल्या समाजाला जागृत करण्यासाठी दादला नको ग बाई, मी झाले वेडी या भारूडांच्या माध्यमातून समाजातील स्त्री – भृण हत्या, पर्यावरण वाचवा, पाणी आडवा पाणी जिरवा, युवा शक्ती, व्यसनमुक्ती, इलेक्ट्रॉनिक मेडिया चा जमाना, मोबाईलचा अतिरिक्त वापर,




देशभक्ती, राष्ट्रभक्ती, सर्वधर्म समभाव या विविध विषयावर भारूडाच्या माध्यमातून प्रबोधन केले.

सकल संतांनी आणि महापुरूषांनी जे समाज सुधारणेचे काम केले तो संदेश भारूडाच्या माध्यमातून श्री. अनिल केंगार यांनी दिला. आजपर्यंत महाराष्ट्रभर जवळपास १९०० पेक्षा अधिक प्रयोग पूर्ण झालेले आहेत.




त्यांनी अनेक विनोदाच्या माध्यमातून नाटय करून निखळ मनोरंजन करत समाजातील विविध चांगल्या गोष्टींचा अंगिकार स्वयंसेवकांनी कसा कराव याचे मार्गदर्शन केले. अत्यंत उत्साही व आनंद देणारा हा कार्यक्रम स्वयंसेवक व विद्यार्थ्यांना प्रबोधनाची मेजवानी देणारा ठरला.

## अविस्मरणीय क्षण















# सांस्कृतिक कार्यक्रम
















